# मार्च महिन्यातील कामांचा तपशील

## भुईमूग (उन्हाळी)

* भुईमूगाच्या उपटया वाणासाठी पेरणीनंतर ३५ व ४५ दिवसांनी दोन वेळा पिकांवर रिकामा ड्रम फिरवावा.
* उभ्या पिकांतील सुक्ष्म अन्नद्रव्यांची कमतरता भरुन काढण्यासाठी ०.५ टक्के लोह व ०.२ टक्के झिंक सल्फेट या मिश्रणाची पेरणीनंतर ३०, ५० व ७० दिवसांनी फवारणी करावी.
* पाने पोखरणाऱ्या किंवा गुंडाळणाऱ्या अळीच्या नियंत्रणासाठी कार्बारील ५० टक्के भुकटी ४० ग्रॅम किंवा क्विनॉलफॉस २५ टक्के प्रवाही २० मिली या प्रमाणात १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. पाने खाणाऱ्या अळीच्या नियंत्रणासाठी क्लोरोपायरीफॉस २० मिली १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.

## ऊस

* १६ आठवडे वयाच्या लागणीस हेक्टरी एकूण शिफारशित खतमात्रेच्या १० टक्के नत्र (३४ किलो नत्र) म्हणजेच ७४ किलो निम कोटेड युरीया खताचा तिसरा हप्ता द्यावा.
* पक्क्या भरणीयोग्य वाढलेल्या २० आठवडे वयाच्या ऊसात आंतरपीके घेतली असल्यास त्यांची परिस्थिती पाहून काढणी करा अथवा सरीतच दाबून भरणीची तयारी करा. यावेळी नांगरीच्या सहाय्याने सरीचे वरंबे फोडून बाकी राहिलेली रासायनिक खतांची मात्रा ४० टक्के (१३६ किलो नत्र) म्हणजेच २९५ किलो युरीया ५० टक्के स्फुरद व पालाश (प्रत्येकी ८५ किलो) म्हणजेच ५३१ किलो सिंगल सुपर फॉस्फेट आणि १४२ किलो म्युरेट ऑफ पोटॅश एकत्र चांगले मिसळून हेक्टरी एकूण सऱ्यांच्या संख्येत विभागून रिजरने भरणी करावी व रानबांधणी करून लगेच पाणी द्यावे.
* आवश्यकतेनुसार जमिनीचा मगदुर आणि जमिनीतील ओलावा पाहून ८ ते १० दिवसाच्या अंतराने नियमित पाणीपुरवठा करावा.
* ठिबक सिंचनाची सोय असल्यास १० ते २० आठवडयापर्यंत ऊसाच्या वाढीच्या अवस्थेनुसार प्रति हेक्टरी ९ किलो नत्र, ५ किलो स्फुरद व ३ किलो पालाश पाण्यात विरघळणारे ही अन्नद्रव्ये सात दिवसांच्या अंतराने अकरा समान हप्त्यात विभागून ठिबक सिंचन प्रणालीमधून द्यावीत.
* सुरु ऊसाची लागण झालेल्या क्षेत्रावर उगवण विरळ झाली असल्यास त्या ठिकाणी लागणीच्या वेळी प्लॅस्टिक पिशवीत अथवा गादी वाफ्यावर वाढवलेली समवयस्क रोपे वापरून नांग्या भरून घ्याव्यात व त्वरीत हलके पाणी द्यावे.
* खोड किडीच्या नियंत्रणासाठी ऊस लागणीनंतर ४५ दिवसांनी ऊसाची बाळ बांधणी करावी. उसात मका, ज्वारी ही आंतरपिके न घेता, कोथिंबीर व पालक ही आंतरपिके घ्यावीत. खोडकीडग्रस्त ऊस देठ मुळासह उपटून अळीसह नष्ट करावा. हेक्टरी ५ फुले ट्रायकोकार्ड १० दिवसाच्या अंतराने ३ वेळा लावावीत. खोड किडीच्या प्रादुर्भावामुळे ऊसाचे शेंडे वाळत असतील तर आवश्यकता असल्यास क्लोरॅनट्रॅनिलीप्रोल ०.४% दाणेदार हे औषध १८.७५ किलो अथवा फिप्रोनिल ०.३% दाणेदार हे औषध २५ ते ३० किलो प्रति हेक्टरी या प्रमाणात वापरावे.
* ६ ते ८ आठवडे वयाच्या सुरु ऊसाला नत्र खताचा दुसरा हप्ता ४० टक्के नत्र (१०० किलो नत्र) म्हणजेच हेक्टरी २१७ किलो युरिया आणि १२ आठवडे वयाच्या सुरु ऊसाला नत्र खताचा तिसरा हप्ता १० टक्के नत्र (२५ किलो नत्र) म्हणजेच हेक्टरी ५५ किलो युरिया ६:१ या प्रमाणात निंबोळी पेंडीबरोबर मिसळून समप्रमाणात विभागून द्यावा व दुसऱ्या दिवशी हलकेसे पाणी द्यावे. तसेच आवश्यकतेनुसार जमिनीतील ओल पाहून ८ ते १० दिवसाच्या अंतराने पाण्याच्या पाळया द्याव्यात.
* ठिबक सिंचनाची सोय असल्यास डिसेंबरमध्ये लागण केलेल्या ऊसाकरीता वाढीच्या अवस्थेनुसार प्रति हेक्टरी ९ किलो नत्र, ५ किलो स्फुरद व ३ किलो पालाश पाण्यात विरघळणारे हि अन्नद्रव्ये सात दिवसांच्या अंतराने अकरा समान हप्त्यात विभागून ठिबक सिंचन प्रणालीमधून द्यावीत. जानेवारीमध्ये लागण केलेल्या ऊसाकरीता वाढीच्या अवस्थेनुसार प्रति हेक्टरी १४.० किलो नत्र, ६.५ किलो स्फुरद व ३.० किलो पालाश हि अन्नद्रव्ये सात दिवसांच्या अंतराने पाच समान हप्त्यात विभागून ठिबक सिंचन प्रणालीमधून द्यावीत. फेब्रुवारीमध्ये लागण केलेल्या ऊसाकरीता वाढीच्या अवस्थेनुसार प्रति हेक्टरी ७.५ किलो नत्र, २.५ किलो स्फुरद व २.५ किलो पालाश हि अन्नद्रव्ये सात दिवसांच्या अंतराने चार समान हप्त्यात विभागून ठिबक सिंचन प्रणालीमधून द्यावीत.
* ऊस तोडणीनंतर पाचट सरीत दाबून घ्यावे.
* ऊसाचे बुडखे मोकळे करून धारदार कोयत्याने जमिनीलगत छाटून घ्यावेत व छाटलेल्या बुडख्यांवर ०.१ टक्के बाविस्टीन फवारावे.(१०० लि.पाण्यात १०० ग्रॅम बाविस्टीन)
* पाचट कुजविण्यासाठी पाचटावर प्रति हेक्टरी ८० किलो युरिया, १०० किलो सिंगल सुपर फॉस्फेट टाकावे व त्यानंतर १० किलो पाचट कुजविणारे जिवाणू शेणखतात मिसळून पाचटावर टाकावे.
* पहिले पाणी दिल्यानंतर ३ ते ४ दिवसांनी वापश्यावर आल्यानंतर पहारीच्या सहाय्याने हेक्टरी १५० किलो नत्र (३२५ किलो युरिया), ७० किलो स्फुरद (४३७ किलो सिंगल सुपर फॉस्फेट), ७० किलो पालाश (११७ किलो म्युरेट ऑफ पोटॅश) यांचे मिश्रण तसेच प्रति हेक्टरी झिंक सल्फेट २० किलो, फेरस सल्फेट २५ किलो याप्रमाणात शेणखतात मिसळून एकत्र करून बुडख्यापासून सरीच्या एका बाजूला ३० सेंमी. अंतरावर व १५ सें.मी. खोलीवर पहारीच्या सहाय्याने द्यावी.
* फेब्रुवारीपुर्वी तोडणी झालेल्या ऊसाचाच खोडवा राखावा, किड कापणीग्रस्त क्षेत्र असल्यास खोडवा ठेवू नये. तसेच कमीत कमी हेक्टरी १ लाख ऊसाची संख्या असलेल्या क्षेत्राचाच खोडवा ठेवावा.
* ठिबक सिंचनाची सोय असल्यास १० ते २० आठवडयांदरम्यान वय असलेल्या खोडव्यास प्रति हेक्टरी ९.० किलो नत्र, ५.० किलो स्फुरद व ३.० किलो पालाश हि अन्नद्रव्ये सात दिवसांच्या अंतराने अकरा समान हप्त्यात विभागून ठिबक सिंचन प्रणाली मधून द्यावीत. पाच ते ९ आठवडयांदरम्यान वय असणाऱ्या खोडवा पिकास प्रति हेक्टरी १४ किलो नत्र, ६.५ किलो स्फुरद व ३.० किलो पालाश हि अन्नद्रव्ये सात दिवसांच्या अंतराने पाच समान हप्त्यात विभागून ठिबक सिंचन प्रणालीमधून द्यावीत. तर १ ते ४ आठवडयांदरम्यान वय असणाऱ्या खोडवा पिकास प्रति हेक्टरी ७.५ किलो नत्र, २.५ किलो स्फुरद व २.५ किलो पालाश पाण्यात विरघळणारे ही अन्नद्रव्ये सात दिवसांच्या अंतराने चार समान हप्त्यात विभागून ठिबक सिंचन प्रणालीमधून द्यावीत.

## गहू

पीक तयार होताच वेळेवर कापणी करावी. काही जातींचे दाणे शेतात सडतात. त्यामुळे बरेच नुकसान होते. म्हणून पीक पक्व होण्याच्या २ ते ३ दिवस अगोदर कापणी करावी. कापणीच्यावेळी दाण्यातील ओलाव्याचे प्रमाण १५ टक्के असावे. गव्हाची मळणी यंत्राच्या सहाय्याने करावी. मळणी करतांना दाणे फुटणार नाहीत याची काळजी घ्यावी.

## फळबाग व्यवस्थापन

* डाळिंब – रस शोषाणाऱ्या किडींचे नियंत्रण करावे. पाणी नियंत्रित वापरावे.
* सिताफळ – नत्रांची उर्वरीत मात्रा दयावी. बहार धरलेल्या बागेत मशागत पूर्ण करावी.
* बोर– बाग ताणावर सोडावी.
* आवळा – अनावश्यक फांदया काढाव्यात.
* कागदी लिंबू – ८–१० दिवसांनी पाणी द्यावे. गरजेनुसार सुक्ष्म अन्नद्रव्यांची फवारणी करावी. सिल्ला, मावा व पाने पोखरणारी अळी : डायमिथोएट २० मिली अथवा इमिडाक्लोप्रीड २.५ मिली/१० लि. पाणी याप्रमाणे फवारणी करावी.

## भाजीपाला व्यवस्थापन

* उन्हाळी वेलवर्गीय भाजीपाला पिकांस खुरपणी देऊन नत्र खताचा दुसरा हप्ता द्यावा.
* वेलवर्गीय पिकांना आधार देण्याचे काम पूर्ण करावे.
* उन्हाळी भेंडी काढणी एक दिवस आड करावी.
* गवार पिकाची काढणी सुरू करावी.
* रबी टोमॅटो पिकाची काढणी योग्य वेळी करावी. लांब अंतराच्या बाजारपेठेसाठी पाठवायचे असल्यास फळांवर लाल रंगाची छटा आल्यावर टोमॅटोची काढणी करावी.
* रबी हंगामातील कोबीवर्गीय पिकांची काढणी करावी. रबी हंगामातील लसूण पिकांवर कोळी या किडीचा प्रार्दुभाव होण्याची शक्यता असते. कोळीच्या नियंत्रणासाठी योग्य ते उपाय करावेत.
* रबी हंगामातील कांदा पीक पोसण्याचे अवस्थेत असल्यास पालाशयुक्त खताचा फवारा द्यावा.
* वेलवर्गीय भाजीपाल्यावर भुरी व करपा रोगाचा प्रार्दुभाव दिसून आल्यास नियंत्रणाचे उपाय करावेत.
* कांदा व लसूण पिकावरील करपा व फुलकिडीचे नियंत्रण करावे.
* भेंडी पिकावर येणारी पांढरीमाशी विषाणूजन्य रोगाचा प्रसार करते त्यामुळे पांढरी माशीचे वेळीच नियंत्रण करावे.
* उन्हाळी टोमॅटोचे पीक एक महिन्याचे झाल्यावर खुरपणी करून नत्र खताची मात्रा द्यावी.
* मिरची व वांगी रोपे तयार झाली असल्यास रोपांची लागवड करावी लागवडीचे वेळेस संपूर्ण खतमात्रेच्या ५० टक्के नत्र, संपूर्ण स्फुरद व पालाश द्यावे.

## केंद्र व राज्य सरकारच्या कृषिविषयक शासकीय योजना

| अ.क्र. | कृषिविषयक योजना | संपर्क |
|---|---|---|
| १. | राष्ट्रीय अन्नसुरक्षा अभियान<br>१. राष्ट्रीय एकात्मिक तृणधान्य विकास कार्यक्रम<br>२. राष्ट्रीय एकात्मिक गळीतधान्य विकास कार्यक्रम<br>३. राष्ट्रीय एकात्मिक कडधान्य विकास कार्यक्रम | तालुका कृषि अधिकारी (कृषि विभाग) |
| २. | राष्ट्रीय कृषि विकास योजना<br>१. कृषि चिकित्सालय तथा शेतकरी प्रशिक्षण केंद्र सुविधा<br>२. कीड/रोग सर्वेक्षण व सल्ला प्रकल्प | तालुका कृषि अधिकारी (कृषि विभाग) |
| ३. | नैसर्गिक आपत्तीग्रस्त शेतकऱ्यांना मदतीसाठी योजना | कृषि व महसूल विभाग |
| ४. | मृद सर्वेक्षण मृद चाचणी योजना | जिल्हास्तरीय कृषि विभागाची मृद चाचणी प्रयोगशाळा |
| ५. | बीज प्रक्रिया योजना | तालुका कृषि अधिकारी ( कृषि विभाग ) |
| ६. | कृषि यांत्रिकीकरणाची योजना | कृषि विकास अधिकारी व गटविकास अधिकारी |
| ७. | राष्ट्रीय कृषि विमा योजना | कृषि व महसूल विभाग |
| ८. | सेंद्रिय शेती योजना | तालुका कृषि अधिकारी |
| ९. | शेतकरी अपघात विमा योजना | तालुका कृषि अधिकारी |
| १०. | राष्ट्रीय फलोत्पादन मंडळाच्या योजना | सहाय्यक सह. संचालक, राष्ट्रीय बागवानी बोर्ड, महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिसर, भोसलेनगर, पुणे – ०२०–२५५३०५८२ |
| ११. | राष्ट्रीय कृषि विकास योजना आणि महाराष्ट्र रोजगार हमी योजनेंतर्गत शेततळी योजना | जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी http:/mahaegs.nic.in/maha.shettale/ |
| १२. | पशुसंवर्धन विभागाच्या योजना | www.adfmaharashtra.in |
| १३. | मत्स्य व्यवसाय विभागाच्या योजना | जिल्हा स्तरीय सहाय्यक मत्स्य व्यवसाय आयुक्त कार्यालय |
| १४. | पुण्यश्लोक अहिल्यादेवी शेळी–मेंढी विकास महामंडळाच्या योजना | नाबार्ड–५४,वेलेस्की रोड, शिवाजीनगर, पुणे www.adfmaharashtra.in |
| १५. | अन्नप्रक्रिया विभागाच्या योजना<br>१. पायाभूत सुविधांचा विकास<br>२. राष्ट्रीय अन्न प्रक्रिया मिशन<br>३. गुणात्मक नियंत्रण/अन्न चाचणी प्रयोग संशोधन विकासासाठी व विक्री वाढीसाठी योजना. | विभागीय प्रमुख, अपेडा, ४था मजला, युनिट क्र.३ व४, बँकिंग कॉम्पलेक्स बिल्डींग क्र. २, सेक्टर १९/अ, वाशी, नवी मुंबई, ०२२–२७८४०९४९. |
| १६. | कृषि पणन मंडळाच्या योजना<br>१ कृषि माल तारण कर्ज योजना<br>२ कांदाचाळ अनुदान योजना<br>३ प्लॅस्टीक क्रेटस् खरेदी अनुदान योजना<br>४ फळ मोहोत्सव अनुदान योजना<br>५ शीतगृह उभारणीसाठी अनुदान<br>६ ग्रामीण गोदाम योजना<br>७ कृषि पणनच्या पायाभुत सुविधांची उभारणी | महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, पुणे प्लॉट नं.<br>आर – ७, छत्रपती शिवाजी मार्केट यार्ड,<br>गुलटेकडी, पुणे – ३७ (०२०–२४२६११९०) |
| १७. | राष्ट्रीय बागवानी बोर्डाच्या योजना<br>१ फलोत्पादन व काठणीपश्चात व्यवस्थापन विषयक योजना<br>२ फलोत्पादनासाठी शीतगृह उभारणी, विस्तार व आधुनिकीकरणासाठी भांडवली अनुदान योजना<br>३ प्रगत तंत्रज्ञान विकास व विकसित तंत्रज्ञान प्रसारण योजना<br>४ बाजारपेठेसंबंधी माहिती उपलब्ध करून देण्याची योजना<br>५ फलोत्पादन क्षेत्राला चालना देण्याकरिता प्रोत्साहनपर योजना | पुणे कार्यालय, सहाय्यक सहसंचालक, राष्ट्रीय बागवानी बोर्ड, एम. सी. ए. ई. आर. आवार,<br>बागवानी बोर्ड, एम. सी. ए. ई. आर. आवार,<br>www.mahanhm.gov.in |
| १८. | राष्ट्रीय औषधी व वनस्पती अभियान | www.mahasilk.gov.in |
| १९. | रेशीम शेती उद्योग योजना | संचालक, रेशीम संचनालय, उंबरेड रोड, नागपूर |
| २०. | भुजल सर्वेक्षण विकास यंत्रणा<br>१ अपशस्वी सिंचन विहीर योजना<br>२ सिंचन विहीरीसाठी जागेची निश्चिती व मार्गदर्शन विषयक योजना | संचलनालय, भुजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा भुजल भवन, शिवाजीनगर, पुणे–५ |
| २१. | कृषि क्षेत्राला चालना देण्याकरिता प्रोत्साहनपर स्पर्धात्मक पुरस्कार<br>१ वसंतराव नाईक कृषिभुषण पुरस्कार<br>२ जिजामाता कृषिभुषण पुरस्कार<br>३ शेतीनिष्ठ शेतकरी पुरस्कार<br>४ शेतकरी पुरस्कार<br>५ डॉ. पंजाबराव देशमुख कृषिरत्न पुरस्कार<br>६ विविध पिकांसाठी स्पर्धा | कृषि विभाग, महाराष्ट्र शासन, तालुका कृषि अधिकारी, पंचायत समिती |

**पाणलोट विकास हा मंत्र खरा, कोरडवाहू शेती समृध्द करा**